जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती
कॅम्प अमरावती ४४४ ६०२
(गृह विभाग)
☎: ०७२१-२६६२०२५/२६६२४९३ फॅक्स : ०७२१-२६६२८४३
Email:- homebranch.collamt@gmail.com Website :- www.amravati.nic.in


क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-७५३ /२०२१ दिनांक :- 22 /०५/२०२१

वाचा :- १. आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५
२. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७
३. मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सुचना पत्र (Break The Chain) क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक १२/०५/२०२१
४. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-७३०/२०२१ दि. १४/०५/२०२१
५. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-७३१/२०२१ दि. १९/०५/२०२१

## आदेश

### (संचारबंदी आदेश दिनांक २३/०५/२०२१ ते दि. ०१/०६/२०२१ पर्यंत)

ज्या अर्थी कोविड-१९ विषाणूच्या संसर्गाचा प्रार्दुभाव झपाट्याने वाढत असल्याने आपात्कालीन उपाययोजनेचा भाग म्हणून मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी "(Break The Chain)" अंतर्गत संदर्भिय क्र. ३ अन्वये निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार संदर्भिय क्र. ४ अन्वये दिनांक १६/०५/२०२१ ते २२/०५/२०२१ पर्यंत संचारबंदी लागु करण्यात आली आहे.

ज्या अर्थी संदर्भिय क्र. ३ अन्वये शासनाने दिलेल्या आदेशाप्रमाणे संचारबंदी ०१ जुन २०२१ पर्यंत वाढविली आहे ते या जिल्हयाकरीता लागु राहतील आणि त्या आदेशामध्ये दिलेल्या अधिकाराप्रमाणे यापुर्वी निर्गमित करण्यात आलेले आदेशामध्ये अंशत: बदल करण्यात येत असुन त्यानुसार मी शैलेश नवाल, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अमरावती मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सदरचे आदेश दिनांक ०१ जून २०२१ पर्यंत कायम करण्याकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) (३) नुसार खालील प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश पारीत करीत आहे. हे आदेश संपूर्ण अमरावती जिल्हयाकरीता दिनांक २३/०५/२०२१ रोजीचे ००.०० वाजतापासून ते दिनांक ०१/०६/२०२१ रोजीचे सकाळी ७.०० वाजेपर्यंत लागु राहतील.

१. सर्व प्रकारची जिवनावश्यक व अत्यावश्यक सेवाअंतर्गत असलेली किराणा दुकाने, भाजीपाला दुकाने, फळ विक्रेते, डेअरी, बेकरी, मिठाई, खाद्य पेय विक्रेता यांची दुकाने, पिठाची गिरणी, चष्म्याची दुकाने, इ. व सर्व प्रकाराची खाद्य पदार्थ विक्रीची दुकाने (कोंबडी, मटन, पोल्ट्री मासे व अंडी यासह) दुग्ध विक्री केंद्रे, दुग्धालय, डेअरी, दुध संकलन केंद्र, दुध वितरण व्यवस्था हया उपरोक्त नमुद केलेल्या सर्व सुविधा सकाळी ०७.०० ते सकाळी ११.०० या कालावधीत नियमित सुरु ठेवण्यास परवानगी राहील.
२. उपरोक्त मुद्दा क्र. ०१ मधील नमुद सर्व जिवनावश्यक व अत्यावश्यक सेवा तसेच सर्व प्रकारची मद्यागृहे, मद्यदुकाने व बार ही दुकाने ही दररोज सकाळी ७.०० ते सकाळी ११.०० या कालावधीत घरपोच सेवेकरीता सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे.
३. हॉटेल, रेस्टॉरंट,खानावळ, शिवभोजन थाळी यांची घरपोच पार्सल सेवा सकाळी ११.०० ते सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत सुरु राहील. कोणत्याही परिस्थितीत ग्राहकास हॉटेल, रेस्टॉरंट, खानावळ, शिवभोजन थाळी येथे स्वत जावुन पार्सल घेता येणार नाही. सदर ठिकाणी ग्राहक आढळुन आल्यास संबधीत आस्थापनेवर कायदेशिर कारवाई केली जाईल. याबाबतीत पर्यवेक्षणाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था/स्थानिक पोलीस स्टेशन व जिल्हा पुरवठा अधिकारी यांची राहील.
४. सर्व प्रकारची शासकीय रास्त भाव दुकाने ही यापूर्वीच्या संदर्भिय क्र. ४ च्या आदेशात नमुद केल्याप्रमाणे सकाळी ७.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत वितरणाकरीता सुरु ठेवण्यात यावीत. संबंधित तहसिलदार तसेच शासकीय रास्त भाव दुकानदार यांनी त्यांचे दुकानांचे लाभार्थी यांचा व्हॉटसअॅप ग्रुप तयार करावा व धान्य वितरणाकरीता टोकन सिस्टम चा वापर करावा.
५. उक्त कालावधीत जिल्हयातील सर्व कृषी उत्पन बाजार समित्या, फळ बाजार धान्य खरेदी, कृषी सेवा केंद्रे ही संदर्भिय क्र. ५ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार सुरु राहतील.
६. संदर्भिय क्र. ५ च्या आदेशामध्ये अंशत: बदल करण्यात येऊन यापुढे कृषी सेवा केंद्रे ही दररोज विक्री करीता सकाळी ७.०० ते दुपारी ३.०० या कालावधीत नमुद केलेल्या सूचना व आदेशानुसार नियमितपणे सुरु राहतील.

७. **संचारबंदीच्या कालावधीत नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय तसेच गरज असल्याशिवाय घराबाहेर पडू नये. ग्राहकांनी दुकानामध्ये खरेदी करण्याकरीता जवळपास असलेल्या बाजारपेठ, अतिपरिचित दुकानदार यांचा वापर करावा. शक्यतो दुरचा प्रवास करुन खरेदी करणे टाळावे. अत्यावश्यक कारणांशिवाय जिल्हयाअंतर्गत प्रवास करु नये. खरेदी करण्याकरीता घरपोच सेवा, ई-कॉमर्स, ऑनलाईन सिस्टम चा वापर करावा.**

८. ***संचारबंदी निर्देशानंतरही अनावश्यकरित्या व विनाकारण फिरणाऱ्या व्यक्ती आढळून आल्यास त्यांची RAT (Rapid Antigen Test) करुन त्यानुसार दंडात्मक व फौजदारी कार्यवाही करण्यात यावी. याबाबतचे नियोजन स्थानिक स्वराज्य संस्था यांनी त्यांचे स्तरावरुन करावे.***

९. *उपरोक्त दिलेल्या निर्देशाव्यतिरिक्त यापूर्वी संदर्भिय क्र. ४ अन्वये पारीत केलेल्या आदेशातील मुददा क्र. १, २, ३, ४, ५, १३, २१, २५ वगळता इतर सर्व मुददे व आदेश हे कायम ठेवण्यात येत असून उपरोक्त नमुद कालावधीकरीता लागू राहतील.*

*सदर आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता- १८६० च्या कलम १८८ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल व संबंधितावर सदर कलमानुसार कारवाई करण्यात येईल अशा व्यक्ती, संस्था, संघटना यांचेवर गुन्हे दाखल करण्यासाठी संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्यास या आदेशाव्दारे पुढील आदेशापर्यंत प्राधिकृत करण्यात येत आहे.*

*सदरचे आदेश हे दिनांक २३/०५/२०२१ चे ००.०० वाजतापासून दिनांक ०१/०६/२०२१ चे सकाळी ७.०० वा. पर्यंत संपूर्ण अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता लागू राहतील. या आदेशाची मोठया प्रमाणात जनजागृती करावी व स्थानिक प्रशासन, पोलीस विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी प्रसिध्दी देऊन कार्यवाही करावी.*

(शैलेश नवाल)
**जिल्हादंडाधिकारी अमरावती**

**प्रतिलिपी:-**

१. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. मा. पोलीस आयुक्त (शहर) यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
३. मा. पोलीस अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
५. आयुक्त, महानगरपालीका अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
६. मुख्य वनसंरक्षक, वन विभाग अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
७. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
८. प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
९. अधिक्षक, राष्ट्रीय महामार्ग पोलीस, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१०. पोलीस वाहतूक शाखा (शहर/ग्रामीण) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता
११. उपविभागीय दंडाधिकारी ------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
१२. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी ------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस
१३. मुख्याधिकारी नगर परिषद/पंचायत ------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस
१४. जिल्हा माहिती अधिकारी अमरावती- **सदर आदेशास अमरावती जिल्हयामधील स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.**
१५. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
१६. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता
१७. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१८. सहा. आयुक्त (कामगार/अन्न व औषधी प्रशासन/समाज कल्याण विभाग) यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.

२१/५

**जिल्हादंडाधिकारी अमरावती**